2017-18


IMPACT FACTOR 3.18

ISSN 2229-4406

*International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects*


# UNIVERSAL RESEARCH ANALYSIS


REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue - XIV, Vol. III**
**Year - VII (Half Yearly)**
**Mar. 2017 To Aug. 2017**

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 -241913
9423346913 / 9503814000
9637935252 / 7276301000

**Website**
www.irasg.com

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Publisher :**
**Jyotichandra Publication**
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

**Price : ₹ 200/-**



CHIEF EDITOR

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

EXECUTIVE EDITORS

**Dr. Suhas Avhad**
Chairman, BOS in Economics,
S. P. Pune University
Pune, Dist. Pune (M.S.)

**Dr. D. Raja Reddy**
Chairman, International Neuro Surjery Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

**Dr. E. Siva Nagi Reddy**
Director, National Institue
of Hospitality & Tourism Management,
Hyderabad (A.P.)

**Dr. A. H. Jamadar**
Chairman, BOS Hindi,SRTMUN &
Head, Dept. of Hindi, BKD
College,Chakur, Dist. Latur (M.S.)

**Dr. Yu Takamine**
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan).

**Dr. Shaikh Moinoddin G.**
Dept. of Commerce,
Lal Bahadur Shastri College,
Dharmabad, Dist. Nanded(M. S.)

**Dr. Sadanand H. Gone**
Principal, Ujwal Gramin
Mahavidyalaya, Ghonsi,
Dist. Latur. (M.S.)

**Scott A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

DEPUTY-EDITOR

**Dr. Balaji S. Bhure**
Head, Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Babasaheb M. Gore**
Principal,
Smt. S.D.D.M.College
Latur, Dist. Latur (M.S.)

CO-EDITORS

**Dr. V.J. Vilegave**
Head, Dept. of P.A.,
Shri. Guru Buddhiswami College,
Purna, Dist. Parbhani (M.S.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
Bhai Kishanrao Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

ISSN 2229-4406
Mar. 2017 To Aug. 2017
IMPACT FACTOR 3.18
Issue : XIV, Vol. II
UNIVERSAL RESEARCH ANALYSIS
URA

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Dissease Management of Leaf Spot in Ambrette From Azadiractha Indiac | Dr. Shankar G. Kukreja | 1 |
| 2 | Indian Financial Sector Commercial Banks | Dr. Sunita S. Yadav | 5 |
| 3 | Insurance Sector: Challenges & Opportunities In India | Dr. Veena Prasad | 9 |
| 4 | Development in Mathematics and Astronomy in Ancient India | Manish Pithadia | 17 |
| 5 | Yoga for Sports Performance | Anjali Barde | 23 |
| 6 | यशपाल के साहित्य में नारी शोषण | डॉ. संतोषकुमार गुंडाप्पा गाजले | 30 |
| 7 | जागतिकीकरण आणि भारतातील महिला सक्षमीकरण | डॉ. बालाजी ग्या. कांबळे | 35 |
| 8 | महाराष्ट्रातील वनांचे प्रकार : एक अभ्यास | डॉ. जगन्नाथ व्ही. दडवे | 39 |
| 9 | जाती अंताच्या लढाईतील, फुले, शाहू, आंबेडकरांचे योगदान | श्री. श्रीराम शरदचंद्र साळुंके | 45 |
| 10 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील सामाजिक दृष्टीकोण | गौतम ऊ. तिजारे | 52 |

10

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील सामाजिक दृष्टीकोण

*गौतम ऊ. तिजारे*
संशोधक
जेजेटी विद्यापीठ,
झुनझुनु (राजस्थान) भारत

Research Paper - Marathi

**प्रास्ताविक :**

तुकडोजीं महाराजांचे संपूर्ण साहित्य हे भारतीय ग्रामीण जीवनाशी निगडीत तसेच वास्तवतेवर आधारीत असे साहित्य असून ते त्यांच्या साहित्याभोवताली फिरणारे असे साहित्य आहे. त्यांनी आपल्या जीवनामध्ये भरपूर असे साहित्य जरी लिहलेले असेले तरी ते संपूर्ण साहित्य आहे. त्यांनी आपल्या साहित्यामध्ये जे सामाजिक वास्तव मांडलेले आहे ते त्यांच्या संपूर्ण साहित्यविश्वामध्ये आपणास पहावयास मिळते म्हणून त्यांच्या साहित्यामध्ये जे सामाजिक विश्व पहावयास मिळते तेच सामाजिक विश्व त्यांच्या साहित्यामध्ये पहावयास मिळते असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. स्वत: अनुभवलेली खेडी, दुरवस्था या गोष्टी अगदी जवळून अनुभवल्या. तत्कालीन खेड्यांची परिस्थिती संवेदनशील मनात अनेक प्रकारच्या उलथापालथी घडवून आणित . यातूनच त्यांच्या मनात ग्रामीण समाजाबाबत जे चिंतन चाले त्याचे प्रत्ययकारी चित्रण तुकडोजी महाराज यांनी केले आहे. खेड्यांतील प्रत्येक गोष्टींचे सूक्ष्मातिसूक्ष्म निरीक्षण करुन आपल्या चिंतनासहित साहित्यामध्ये ओव्यांमधून मांडण्याचा प्रयत्न केला. साहित्यामध्ये खेडेगाव, माणसे, श्रममूल्य, संघटनशक्ती, जीवनशिक्षण, महिलोन्नती, दलितोन्नती, ग्रामरक्षण, ग्रामनिर्माण कला, ग्राम आरोग्य, ग्राम-कुटूंब, ग्रामसंस्कार, ग्रामातील गरीबी, श्रीमंती, आदि बाबतीतले घडविलेले समाजदर्शन इ. बाबींचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**तुकडोजींच्या साहित्यातील खेडे :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी साहित्यामध्ये 'ग्राम' आणि 'ग्रामनाथ' यांनाच केंद्रबिंदू मानून

आपले विचार काव्यसूत्रात गुंफून व्यक्त केले. नुकतीच देशामध्ये स्वातंत्र्याची पहाट उगवली. देश स्वातंत्र्यात नुकताच श्वास घेत. अजून स्वातंत्र्यसूर्याची किरणे थेट गावापर्यंत पोहोचली. अशा नुकत्याच जन्म घेतलेल्या तुकडोजींनी विचार करुन ग्रामविकासाचे जे चिंतन मांडले आहे ती वेळ किती अचूक होती याची कल्पना येते. मुळात तुकडोजींचा जन्मच यावली या छोट्याशा गावात झाला. त्यांचे जवळजवळ सर्वच जीवन लहान मोठ्या खेड्यात गेले. कितीतरी खेडी रात्रंदिवसच्या भ्रमणात त्यांनी पायाखालून घातली. म्हणूनच ग्रामव्यवस्थेच्या दृश्य-अदृश्य अशा सर्वच घटकांशी त्यांचा थेट परिचय होता. जवळून असा संबंध आल्यामुळेच तत्कालिन भारतीय खेडीच प्रतिनिधी म्हणून साहित्यामध्ये आलेली आहेत. याबाबत निरंजन माधव यांनी 'राष्ट्रसंताचे साहित्य: दिशा आणि ध्यास' या लेखात म्हटले आहे, "गांधी-विनोबा यांच्या वैचारिक सूत्रांनी सूचित केलेल्या ग्रामविकासाच्या दिशेचे परमोच्च टोक तुकडोजींच्या चिंतनसूत्रांमध्ये जीवनलक्ष्यी आयामांसह ग्रंथित झालेले दिसते. प्रत्यक्ष ग्राम जीवननुभव, चिंतनाच्या पातळीवर दु:खितांच्या जगण्याशी सहकंप पावण्याच्या असाधारण शक्तीमुळे या अनुभवाला आलेली विलक्षण झळाळी, संतदृष्टीचा परिणाम यामुळे तुकडोजींच्या विचाराला एक अनुपम लावण्य आणि जीवनस्पर्शी महात्म्य प्राप्त झालेले आहे."

साहित्यामध्ये जे जीवनाचे जिवंत चित्रण आले त्याबद्दल भूतपूर्व न्यायमूर्ती सर भवानीशंकर नियोगी आपले मत मांडतात, असल्याप्रकारचे ग्रंथ आलमारीतून ग्रंथ काढून ते वाचून निर्माण होत नसतात, अनुभव घ्यावा लागतो. महाराजांनी आपले सारे जीवन खेड्यांत घालविले तेथील जीवनाचा अनुभव घेतला; त्यांना त्यातील अडीअडणी व उणीवा यांचे दर्शन घडले.

**१ 'देखवे ना डोळा ऐसा हा आकांत':**

साहित्यामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सर्वच भागातून मांडणी केली आहे. मात्र स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दशकात खेड्यांची दुरवस्था अधिक प्रभावीपणाने मांडली. गावे कशी अस्वच्छतेच्या, अज्ञानाच्या, रोगराईच्या गर्तेत सापडली याचे चित्रण केले.

संपूर्ण देशभर 'रातभर जागना और दिनभर भागना' त्यांनी भ्रमण केले. विविध प्रदेशात विदर्भ, मराठवाडा, खानदेश, निज़ाम हैद्राबाद स्टेट, मध्य प्रदेश, छत्तीसगड़ अशा अनेक प्रदेशातून मुक्त भ्रमंती केल्यावर जे ग्रामीण जीवन त्यांना दिसले तेच अंत:करणातून जवळीक साधून आत्मीयतेने अनुभव जमा केले. या प्रदेशात भ्रमंती केल्यावर जे ग्राम त्यांना दिसले ते अनेक समस्यांनी ग्रस्त होते.

तुकडोजी महाराज यांनी केलेले खेड्याचे वर्णन लोकांनी केलेल्या खेड्याच्या वर्णनापेक्षा वेगळे आहे. आता पर्यंत कवी, लेखकांनी कल्पनेच्या भराऱ्या घेत प्राचीन काळची खेडी वर्णिली . याच प्राचीन काळच्या वर्णनावरुनच आजही अनेक लोक रचना करीत आहेत. पूर्वीच्या काळची स्वयंपूर्ण होती. निसर्गाचे सान्निध्य, मनापासून केला जाणारा पाहुणचार, भरभरुन देणारी शेती, एकत्र कुटूंबपध्दती साऱ्या गोष्टींमुळे 'गड्या आपुला गाव बरा' असे म्हणण्याइतपत समृध्दी गावे सर्वांनाच

आवडत. ही परिस्थिती बदलली अनेकांच्या अजून लक्षातही आले नाही.

तुकडोजी महाराजांच्या मते या परिस्थितीला कारणीभूत आहेत ते जबाबदार पुढारी. त्यांनी केलेल्या दुर्लक्षामुळे ही परिस्थिती ओढवली . जेव्हा जबाबदार कार्यकर्ते मंडळी डोळ्यावर कातडे ओढून समाजकार्याकडे दुर्लक्ष करतात, परिस्थिती उद्भवते. त्यामुळे जे जबाबदार कार्यकर्ते आहेत आपली जबाबदारी ओळखून समाजाचे हित-अहित ओळखावे व त्यानुसार आपली भूमिका वठवावी. हे महत्वाचे खांब असे आळशी होऊन स्वत: भोगवादी बनून स्वत:मध्ये मश्गुल होतील तर समाज अवनतीकडेच जाणार हे भविष्य सांगण्यासाठी कुठल्याही भविष्यकाराची गरज लागत नाही, ग्रामाधिकार दिले आहेत त्यांनी आपले अधिकार ग्रामाच्य सेवेसाठी योग्यरीतीने न वापरल्यामुळे आज ही परिस्थिती ओढवली असल्याचे आकलन तुकडोजींनी मांडले आहे.

२ आदर्श गाव हाच राष्ट्राचा पाया :

आज प्रत्येक गाव दुभंगलेल्या अवस्थेत आहे. गावे जर अशाच अवस्थेत जीवन जगणार असतील साऱ्या राष्ट्रांचे जीवनच खिळखिळे झाले असेच म्हणावे लागेल. दुरदृष्टीने जर देश घडवायचा असेल तर त्याची सुरुवात गावापासूनच करायला हवी. तुकडोजी महाराज म्हणतात,

"हे सगळेचि दुरुस्त कराया । शहाण्यांनी जावे खेड्याकडे या ।
आदर्श ग्राम हाचि पाया । राष्ट्राचा असे म्हणोनि "॥

महात्मा गांधींनी ग्रामस्वराज्याचा मंत्र देऊन 'खेड्याकडे चला' असा नारा दिला. त्यानंतरही अनेकांनी खेड्यांकडे पाठ फिरवली. आतापर्यंत खेड्यात मिळणाऱ्या अनेक चांगल्या गोष्टी शहरामध्ये नेऊन विकल्या. उत्तम प्रकारचा भाजीपाला, उत्तम प्रकारचे दुध, फळे या सर्व गोष्टी खेड्यात निर्माण होत. मात्र विकल्या जात शहराच्या बाजारपेठेत. आता आता तर खेड्यातील चांगली माणसेही खेड्यातल्या बिकट परिस्थितीला कंटाळून शहरात निघून जात आहेत. जणू खेड्यांना कुणी वालीच उरला नाही. तुकडोजी महाराज इथे हेच सांगत आहेत जे जे शहाणे आहेत ज्यांना या भयानक समस्यांची जाणीव आहे त्यांनी तरी या सर्व बाबींचा विचार करुन खेड्याकडे जाऊन आदर्श ग्रामाचा पाया रचला पाहिजे. गावे जर भंग पावतील तर देशही भंग पावेल म्हणून राष्ट्र घडवण्याच्या कामी सर्वांनी सहकार्य करावे हेच तुकडोजींना इथे सूचवायचे आहे. याच संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या भाषणात नवेगाव-मिथूरच्या ग्रामदान शिबिरप्रसंगी म्हणतात, "मित्रांनो ! आदर्श ग्रामनिर्माण योजना" हा आजच्या युगाचा महत्वाचा प्रश्न आहे. एका काळी यज्ञाला जे महत्व होते ते महत्व आजच्या काळी या योजनेला आहे. आपल्या प्रत्येक गावाला आज फार पुढे जावयाचे आहे. राज्याचे किंवा राष्ट्रांचे केंद्र दिल्ली नसून आपले प्रत्येक गाव आहे. आपण आपले गाव आदर्श करु तरच राष्ट्र सुखी, समृध्द, सामर्थ्यवान व उन्नत होईल. गांवा-गावांतून आपण सुरु केलेले कार्य पाहण्यासाठी दिल्लीचे थोर-थोर नेते येत आहेत व येत राहतील. अनेक पुढारी मान आपल्या छोट्या

- छोटया खेड्यांतील कार्यासंबंधी मोठ्या आस्थेने विचारीत असतात. अशी चिमुकली गावे आदर्श झालेली पाहण्यासाठी सारेच उत्सुक आहेत. पूज्य महात्मा गांधींची किंबहुना आपल्या सर्वच संत महात्म्यांची इच्छा देखील हीच होती.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे आधुनिक संत होते. अध्यात्मिक उपदेशापेक्षा ऐहिक गोष्टींवरच त्यांचा भर होता. मानवी जीवनात मृत्यूनंतरच्या जगापेक्षा मृत्यूच्या अगोदरचे जीवन चांगल्या पध्दतीने जगण्यावर त्यांचा अधिक भर होता. म्हणूनच मेल्यानंतरचे स्वर्ग व नरक यांची अधिक चर्चा न करता ऐहिक जीवनाला स्वर्ग कसे बनवता येईल याचाच ध्यास त्यांनी घेतला होता. म्हणूनच गावचे रस्ते, घरे, परिसर स्वच्छ रहावा यासाठी त्यांनी प्रबोधन केले.

**मानवी विष्ठेचे व्यवस्थापन :**

घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासोबतच मानवी विष्ठेचे व्यवस्थापन हा आजही देशासमोरचा एक अत्यंत गहन असा प्रश्न आहे. आजही देशातील एकूण लोकसंख्येच्या ५४% लोकसंख्या ही उघड्यावर शौचास जाते. ग्रामीण भागातील एकूण जनतेपैकी ७५% जनता शौचालयाचा वापर न करता रस्त्यावर, शेतात, नदीला, ओढ्याकठी आपल्या मलमूत्राचे विसर्जन करते. यातही वृध्द, स्त्रिया, मुली यांची फारच कुचंबणा होते. याबाबतही राष्ट्रसंत प्रचंड आग्रही होते. उघड्यावर शौचास जाण्याची ही दुष्ट परंपरा बंद व्हावी यासाठी आपल्या भजन आणि भाषण तसेच लेखन यातूनही आग्रहाने भूमिका ते मांडतात.

ग्रामांच्या दुरावस्थेला जबाबदार असलेल्या या मुख्य समस्येसंदर्भात तुकडोजी महाराज किती जागरुक आणि आग्रही होते या एका मुद्यावरुन आपल्या लक्षात येते. इथे ही स्वत:चे अज्ञान स्वत:ला कळत नसते यासाठी जागरुक जाणत्यांनी पुढाकार घ्यावा व सर्वांना जागृत करावे असे तुकडोजी म्हणतात.

"हे समजाविण्यांहि पाहिले कमेटी । तिने करोनि नाना आटा आटी ।
जनता जागृत करोनि शेवटी । उत्पन्न द्यावे वाढवोनि ॥"

कुठलीही इमारत जशी खांबावर उभी असते तसेच प्रत्येक गावाचे भवितव्य हे त्या गावातील कारभारी, पंच यांच्यावर अवलंबून असते. तेच खऱ्या अर्थाने गावाचे भविष्य ठरवित असतात. या पंचांनी कमेटी स्थापना करुन सर्वांचे उद्‌बोधन करावे व सर्वांना शैचालयाचे महत्व पटवून द्यावे त्यासाठी नाना क्लृप्त्या वापराव्या. अशा पध्दतीने मलमूत्राचे विसर्जन करुन ग्राम आणि ग्रामनाथाचे आरोग्य रक्षण करावे. हा संदेश इथे राष्ट्रसंत देतात.

**सहकार्याची बोधशाळा : रामधून :**

अस्वच्छता आणि रोगराई हाच खेड्यांचा खरा शत्रू आहे हे तुकडोजींनी ओळखले होते. या दोन शत्रूंशी लढाई करण्यासाठी त्यांनी समाज मनाचा कानोसा घेऊन निकोप समाज घडवण्यासाठी

प्रयत्न केले.

**श्रम हीच दौलत :**

साहित्यामध्ये तुकडोजींनी श्रम-संपत्तीबाबत चर्चा केली आहे. मानवी जीवनात श्रमाला अनन्यसाधारण असे महत्व आहे. हे सारे जगच श्रमिकांच्या तळहातावर तरले आहे. याबाबत अण्णाभाऊ साठे यांनी म्हटलेही आहे की ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून श्रमिकांच्या तळहातावर तरली आहे. या जगात जर श्रमिकांनी श्रम केले नाही तर हे सारे जग ठप्प होऊन जाईल. ही सारी समाज व्यवस्था क्षणार्धात एकाजागी थांबेल.

राष्ट्रसंत तुकडोजींनी श्रमाबाबत जे विचार मांडले आहेत त्यांचा अभ्यास केल्यावर ते जागतिक विचारवंत आहेत हेच आपणास मान्य करावे लागते. या देशाला विविध धार्मिक आणि रुढीवादी परंपरा लाभल्या आहेत. प्रत्येक गोष्टीला या देशात धर्म आणि ईश्वराच्या चौकटीत बसवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. धर्म आणि कर्म यांची न तुटणारी जोड घालण्यात आली आहे. मात्र साऱ्याच गोष्टींना कर्म मानण्याची गरज नाही असे राष्ट्रसंत ठामपणे सांगतात. नित्यनैमित्तीक

**राष्ट्रसंतांचे ग्रामनिर्माण :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी साहित्यामध्ये ग्रामनिर्माणातून राष्ट्रनिर्माणाचे स्वप्न पाहिले. तत्कालिन ग्रामजीवनाचे सम्यक दर्शन आणि अनेक जीवनानुभव घेतल्यावर तुकडोजींच्या मनात ग्रामनिर्माणाच्या काही एक संकल्पना निर्माण झाल्या. प्रचलित जीवनातील बेकारी, दारिद्र्य, विषमता यांच्या मुळाशी गेल्यावर ग्रामनिर्माणाचा हाच एक मार्ग त्यांच्या विवेकबुध्दीला पटला. ग्रामनिर्माणातले अनेक अडथळे हेरुन त्यांना दूर करण्याचे मार्ग शोधून तुकडोजी महाराजांनी त्यावर चिंतन केले. या त्यांच्या चिंतनातूनच ग्रामगीतेतील तेरावा अध्याय 'ग्रामनिर्माण कला' हा अध्याय लिहिला आहे. आज आपल्या देशाने लोकशाही स्विकारली आहे. तिचे जसे फायदे आहेत, तसेच काही तोटेही आहेत. याबद्दल लोकशाही प्रक्रियेत ज्यांनी आयुष्यभर काम करुन अनेक घटनात्मक पदांवर काम केले असे त्र्यं.शि. उर्फ बाळासाहेब भारदे लिहितात, "पाश्चात्य लोकशाहीमध्ये लोकनेतृत्य म्हणजे लोकशाही असल्याने लोकनेतृत्वाचाच विचार पक्ष कारण करते. लोककर्तृत्वाचा विचार होत नाही. "लोकहो, आमच्या मागे या आम्ही तुमचे प्रश्न सोडवू" असा सर्व पक्षांचा प्रचार असतो तेव्हा लोकांनाही वाटते की प्रश्न आपल्याला सोडवायचे नाहीत, प्रश्न पुढारी सोडवणार आहेत. आपल्याला फक्त त्यांच्या मागेच जावयाचे आहे. म्हणजे मत द्यावयाचे आहे. बाकी काही करावयाचे नाही. या वृत्तीमुळे लोकांची उपक्रमशीलता व क्रियाशीलता जागी न होता सरकारने, पक्षाने वा संस्थांनी आपल्या मागण्या पुऱ्या कराव्यात आपण मात्र काही करु नये अशी भावना देशात पसरली आहे."

प्रत्यक्ष लोकशाही प्रक्रियेत काम केल्यानंतर अनेक वर्षानंतरचे हे बाळासाहेब भारदे यांचे अनुभावाचे बोल आहेत. विकास ही बाब शासनाच्या अखत्यारीतील आहे. मात्र राष्ट्रसंतांनी या

जोडले आहे. आपली स्वत:ची जबाबदारी इतर भावनेला छेद देत विकासाचे नाते प्रत्यक्ष व्यक्तिशी नव्हते. म्हणूनच त्यांनी सामुदायिक संस्थेवर ढकलून आपण नामानिराळे राहणे राष्ट्रसंतांना पसंत भूमिका मांडली. कोणत्याही विकासाबरोबरच प्रत्येक व्यक्तिच्या स्वत:च्या विकासाबाबत अगोदर मोठी व्यवस्था निर्माण होत मोठ्या निर्माण होताना अनेक छोट्या छोट्या संस्थांचे संघटन एकत्र येऊन आहे. ते म्हणतात, "आदर्श असते. यासंदर्भात डॉ. सुभाष सावकरांचे मतही लक्षात घेण्यासारखे समाज रचना कशी असावी ? या प्रश्नाचे उत्तर आहे -

**राष्ट्रसंतांची ग्रामनिर्माणाची सौंदर्यदृष्टी :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी साहित्यामध्ये जे तत्वज्ञान काव्यरुपाने मांडले आहे त्याचा अभ्यास करताना जागोजागी राष्ट्रसंतांच्या कलात्मक सौंदर्यदृष्टीचा प्रत्यय येतो. ग्रामनिर्माणाच्या कामी सर्व कलाकारांची मदत घेणे आणि यातून समाज आणि कलावंत यांची सांगड घालणे, ग्रामनिर्माणाबरोबरच कलावंतांच्या जीवनाचे उत्रयन साधणे अशा अनेक बाबी एकाचवेळी राष्ट्रसंत साधून घेतात. यातूनच त्यांच्या हळूवार मनाचा प्रत्यय येतो. ग्रामनिर्माणाचे त्यांची मांडलेले स्वप्न १३ व्या अध्यायात अभ्यासताना त्यांच्यातील तरल आणि उत्कट सौंदर्यदृष्टीचा आपणास परिचय होतो. त्यांच्या सौंदर्यदृष्टीचा प्रत्यय आपणास खालील ओळींतून होतो,

"कोणी केली शेतीची रचना । धुरे, बंधारे, वाफे नाना ।
पाहता दिसती सरळ लैना । शेतीमाजी ॥
झाडे दिसती ओळीत बध्द । सरळ, सुंदर, हिरवी शुध्द ।
घरमालकीची करी खुद्द । काम आपुल्या हांतांनी ॥
घराभोवती बाग केली । सांडपाण्यावरी झाडे वाढली ॥
फळाफुलांची रोपे, वेली । भाजीपाला नित्याचा ।
घरातुनी बाहेर दिसेना, पाणी । प्रवाह करीतसे आतुनि ।
धुर जातसे धुराड्यांतुनी । गोठ्यात गोमुत्र न साचे ॥
घरामाची निर्मळपण । टापटिपीचे वर्तन ।
प्रत्येक वस्तु ठेविल्याचे स्थान । सरळ दिसे पाहताची ॥
दारासमोर जे जे दिसले । ते ते कलेनेची सुंदर सजले
आपुल्याच गावी निर्मिले । कलाकारांनी ॥
ऐसी घरादाराची सुंदरता ॥ आपणची आणावी स्वत: ।
कोणीही डोळे भरोनि पाहता । प्रसन्न होती अंतरी ॥

उरोक्त ओळींमधून रेखाटलेले ग्राम रचनेचे रेखाचित्र हे राष्ट्रसंतांच्या उत्कृष्ट अशा सौंदर्यदृष्टीचे प्रतिक आहे. आज जेव्हा आपण अनेक गावात जातो तेव्हा वेडीवाकडी घरे कुठेही पुढे आलेले ओटे,

नाल्या असून किंवा नसूनही रस्त्यावर आलेले घाण सांडपाणी, दर्प येणारे गुरांचे गोठे, अवकळा आल्यासारखी दिसणारी घरे हे गावाचे चित्र आहे.

**जीवन शिक्षण :**

शिक्षणाने माणूस घडतो आणि माणसामाणसांनी समाज घडतो. यासाठीच माणसाच्या जीवनात शिक्षणाला अनन्यसाधारण असे महत्व आहे. 'विद्येविना मती गेली ... एवढे सारे अनर्थ एका अविद्येने केले' असे महात्मा फुले यांनी सांगितले आहे. याच अविद्येमुळे माणसांच्या पिढ्यान् पिढ्या मातीत गेल्या, म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांसारख्या द्रष्ट्या महापुरुषाने जीवनात शिक्षणाला महत्वाचे स्थान दिले. शिक्षणाने माणसाचे जीवन उजळून निघते म्हणूनच ते नुसते शिक्षण असा उल्लेख न करता 'जीवन शिक्षण' असा उल्लेख करतात.

ज्या काळात तुकडोजींनी ग्रामगीतेतून आपले शिक्षणविषयक विचार मांडले तो काळ नुकताच मिळालेल्या स्वातंत्र्याचा होता. स्वातंत्र्याचा बालसूर्य नुकताच उगवलेला होता. मात्र दिडशे वर्षापासून स्थिरावलेल्या इंग्रजांच्या अनेक गोष्टी भारतीय जीवनात चांगल्याच रुजल्या होत्या. इंग्रजांचे राहणीमान, शिक्षणपध्दती, न्यायव्यवस्था, प्रशासन व्यवस्था, वैज्ञानिक शोधांनी बदललेली जीवनपध्दती या साऱ्या गोष्टींनी बरेचसे मुलगामी स्वरुपाचे बदल भारतीय जीवनपध्दतीत झाले होते. कुठल्याही देशात जे जेते असतात त्यांच्या अनेक गोष्टींचे अनुकरण जीत लोक करत असतात. भारतातही इंग्रजांच्या अनेक गोष्टींचे अंधानुकरण सर्रासपणे केले जात होते.

**राष्ट्रसंत तुकडोजींचे भू-वैकुंठ :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामनिर्माणातील सर्वोच्च संकल्पना म्हणजे 'भू - वैकुंठ' होय. प्लेटो आणि अरिस्टॉटल यांनी जी आदर्श राज्यव्यवस्थेची संकल्पना आधुनिक राज्यशास्त्रात मांडली आहे. त्याच आदर्श राज्यव्यवस्थेची काव्यात्म अशी प्रतिमा म्हणजेच राष्ट्रसंतांचे भू-वैकुंठ होय. समाजव्यवस्थेत मांगल्याचे स्वप्न हे प्रत्येक महापुरुष बघतच असतात. समाजातील अंतिम घटकाचे सुख समाधान हेच महापुरुषांचे अंतिम ध्येय असते. ग्रामगीतेच्या एकोणचाळिसाव्या अध्यायात ग्रामीण समाजरचनेतील अंतिम घटक असलेले 'गाव' संपूर्णपणे सुखी झाल्याचे स्वप्न पाहिले. त्याच खेड्याचे वर्णन त्यांनी 'भू-वैकुंठ' या अध्यायात करुन ठेवले आहे.

ज्याप्रमाणे संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत 'पसायदान' मांगितले. महात्मा गांधीनी आपली 'रामराज्या' ची संकल्पना मांडली. त्याचप्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी त्यांना अपेक्षित असलेली ग्रामीण समाजरचना कशी असावी याचे चित्रण 'भू-वैकुंठ' या अध्यायात चित्रित केले आहे. ग्रामीण भागात कष्ट करुन हलाखीचे जीवन जगणारा ग्रामनाथ स्वयंपूर्ण कसा होईल ? याचेच चिंतन संपूर्ण ग्रामगीतेमध्ये आपणास आढळते. ग्रामनाथला दु:ख-दारिद्र्याच्या खाईत लोटणारे अंतस्थ आणि बाम्ह शत्रू कोण आहेत ? त्यापासून त्याचा बचाव कसा करता येईल या सर्व बाबींचा सूक्ष्म तपशील

त्यांनी ग्रामगीतेमध्ये देत ग्रामनाथाच्या उच्चतम जीवनाची पातळी कशी असेल याचे उत्तम वर्णन या 'भू-वैकुंठ' अध्यायात केले आहे.

दुर्दैवाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्वप्न आजही अधुरेच आहे असे म्हणावे लागेल. त्यांना अपेक्षित असलेली ग्रामीण व्यवस्था स्वातंत्र्यानंतर पासष्ट वर्षे उलटून ली तरी आपण उभारु शकलो नाहीत. हे कटू असलेले वास्तव आपणास स्विकारावेच लागेल. म्हणूनच त्यांनी अपेक्षिलेली समाजरचना आजही आपल्यासाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या 'भू-वैकुंठ' या संकल्पनेबद्दल निरंजन माधव म्हणतात, "राष्ट्रसंतांनी इथे ग्रामगोकुळाचे स्वप्न पाहिले. त्यासाठी लागणाऱ्या कल्पक आयोजनाची प्रभावी दिशाही दर्शवली. संसारातील अपूर्णता, समाजातील अंधश्रध्दा, रुढी परंपरांचे अंधानुकरण, सामाजिक तत्वांचा हैदोस यावर भाष्य करुन या अपुर्णता अज्ञान अराजक यांच्यातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी ग्रामस्वराज्याची अभिनव स्वप्न-संकल्पना - संरचना सिध्द केली."

**तंटामुक्त गाव संकल्पना :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी कल्पिलेल्या 'भू-वैकुंठा' मध्ये गावातील शांततेवर अधिकाधि भर दिला आहे. ग्राम हे कुटूंब मानून त्यांनी परस्परातील व्यवहारांना एक नवे परिणाम उपलब्ध करुन दिले आहे. गावात रहाणाऱ्या माणसांमध्ये परस्परात कसे व्यवहार असले पाहिजे जेणे करुन गावात शांतता राहिल हे सांगताना ते म्हणतात,

"गावात नाही झगडा, तंटा । कोणी नाही बोलणार उफराटा ।
सरळ, सालस स्वभाव चोखटा । प्राणियांचा दिसावा ॥
जरी मत भिन्न झाले । तरी पाहिजे गावातचि मिटविले ।
आपुल्या गावाविण नाही उरले । कोर्ट - कचेरी काम कोठे ॥
गावचा झगडा गावीच मिटे । निवडणुकीचे काम नव्हे खोटे ।
लंदफंद गावात नाही कोठे । ऐसे ग्राम सुंदर हे ॥"

आजच्या न्यायव्यवस्थेवर पडणारा ताण, पोलिस प्रशासनाची रात्रंदिवस उडणारी धावपळ या सर्व बाबी बघितल्या म्हणजे या ओळींचे मोल आजही किती मोठे आहे याची प्रतिची येते. आजही अनेक लोक गावागावांमध्ये किरकोळ कारणांसाठी, धुऱ्याबांधोऱ्यांच्या वादापायी, किरकोळ इस्टेटीच्या वाटणीसाठी एकमेकांची डोकी फोडून पोलिस स्टेशनचे दरवाजे ठोठावतात. तिथे पोलिस यंत्रणेकडून दोघांची होणारी पिळवणूक हे विदारक वास्तव आहे. कोर्ट-कचेरी, जमानत, वकील, तारखांवर तारखा या दुष्टचक्रात अडकून आपला वेळ, पैसा बरबाद करतात. यातूनही न्याय नावाची गोष्ट काहीच हाती लागत नाही. अशाप्रकारे अपिलावर अपिल करण्यातच अनेक लोकांचे आयुष्य जाते आणि पदरी निराशा व अपमानच पडतो.

हे सर्व टाळण्यासाठी राष्ट्रसंतांनी काळजाच्या देठापासून या ओळी लिहिल्या आहेत. तत्कालीन

आणि आजच्या भयाण वास्तवात राष्ट्रसंतांच्या या विचारांची किती गरज आहे हे आपल्याला दिसून येते. मतभेद जरी असले तरी मनभेद होऊ नये यासाठी वाद गावातच मिटविला पाहिजे.

## संदर्भ सूची :-


१. जाधव, निरंजन - राष्ट्रसंतांचे साहित्य : दिशा आणि व्यास राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरवग्रंथ सं.रा.तु. भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २ आक्टो. २००९, पृष्ठ क्र. ७१,७२.

२. तुकडोजी महाराज-ग्रामगीता प्रकाशन श्रीगुरुदेव ग्रामगीता प्रतिष्ठान गुरुकुंज आश्रम जि. अमरावती विसावी आवृत्ती २०१० सं. स्व. सुदामजी सावकर, पृष्ठ क्र.४२.

३. पाळेकर, प्राचार्य डॉ. रा. स. - राष्ट्रसंत आणि सामुहिक समाज व्यवस्था. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरव ग्रंथ संपादक प्राचार्य रा. तु. भगत, चैतन्य प्रकाशन कोल्हापूर प्रथमावृत्ती २ ऑक्टो. २००९ पृष्ठ क्र. २५०, २५१.

४. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज- ग्रामगीता प्रतिष्ठान गुरुकुंज ग्रामगीता प्रतिष्ठान अध्याय बारावा पृष्ठ क्र. १०७, ओवी क्र.२६.

५. कडवे, प्रा. रघुनाथ - राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय खंड नववा (१९५६-१९५८) प्रकाशक मो. रा. पुनसे श्री. गुरुदेव प्रकाशन, गुरुकुंज आश्रम जि. अमरावती प्रथमावृत्ती पृ. क्र. ७४.

६. कडवे, प्रा. रघुनाथ - ग्राम तसा देश वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मशताब्दी विशेषांक २०१०, सं. डॉ. अशोक कामत.

७. कुलकर्णी, डॉ. सौ. आरती - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज 'भू-वैकुंठ-', राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरव ग्रंथ, सं. प्राचार्य रा.तु. भगत, चैतन्य प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती २ ऑक्टो. २००९.'२००६,पृष्ठ


S.P. Mahavidyalaya, Bhoom
BHOOM
Tq.Bhoom Dist O'bad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya, Bhoom
Dist.Osmanabad